MHNS210005302022

## नि.क्र.१६ वरिल आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता याचे आदेश २६ नियम ९ प्रमाणे कोर्ट कमिशनर म्हणून उपअधिक्षक भूमी अभिलेख, नांदगाव यांचे कार्यालयातील तज्ञ मोजणीदार यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. अर्ज वाचला. रोजनामा पाहीला प्रतिवादींनां संधी देउनही त्यांनी म्हणणे सादर केले नाही. विधिज्ञ श्री. सोनवणे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी व त्याचें विधीज्ञ गैरहजर अर्ज, दावा, कैफियत व प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. दावा मिळकत ही मौजे मनमाड येथील स.न १२४/१० क्षेत्र ०४ हे.५८ आर पैकी सटाणा रस्त्यालगतचे पुर्व—पश्चिम ३०.१२ (१००फुट) मिटर व दक्षिण—उत्तर १२.८० मिटर (४२फुट) आणि सदर स.न १२४/१० पैकी प्रतिवादीचे मालकीचे पुर्व—पश्चिम ४५ फुट व दक्षिण—उत्तर ४० फुट असे ण्कुण १८०० चौ. फुट अशा आहेत.

३. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीने प्रतिवादीने दावामिळकतीमध्ये केलेले अतिक्रमण काढुन मिळणेची विनंती केली आहे. वादीचे एकुण कथन असे आहे कि प्रतिवादीनं दावा कलम १ अ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीत दक्षिण बाजुचे क्षेत्रात २० फुट बाय ४० फुट इतके जागेत अतिक्रमण केलेल आहे व त्यात

बांधकाम केले आहे. प्रतिवादीने आपले कैुयित नि क्र १४ मध्ये दाव्यातील कथीत अतिक्रमण नाकारले आहे परंतु प्रस्तुत अर्जास म्हणणे सादर केलेले नाही व स्पष्ट असा विरोध केलेला नाही. अशा परिस्थितीत वादी कथन करत असलेप्रमाणे अतिक्रमण झाले आहे किंवा नाही ? ही बाब ठरविण्याकरिता नमुद दोन्ही मिळकतीची जागेवरील परिस्थिती अभिलेखावर येणे आवश्यक आहे. अतिक्रमणाची बाब ही केवळ कागदपत्र व तोंडी पुराव्यावरून सिद्ध होण्यासारखी नाही. त्यामुळे या दाव्यातील मूळ वाद मिटविण्याकरिता तज्ञ व्यक्तीची म्हणजेच उपधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, नांदगाव यांचेकडील मोजणीदार यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणुक करून अर्जात व दाव्यात नमूद दोन्ही मिळकतींची एकत्रित मोजणी करणे उचित होईल. परिणामत: खालीलप्रमाणे आदेश करत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. दाव्यात नमूद मौजे स.न १२४/१० क्षेत्र ०४ हे.५८ आर पैकी सटाणा रस्त्यालगतचे पुर्व—पश्चिम ३०.१२ (१००फुट) मिटर व दक्षिण—उत्तर १२. ८० मिटर (४२फुट) आणि सदर स.न १२४/१० पैकी प्रतिवादीचे मालकीचे पुर्व—पश्चिम ४५ फुट व दक्षिण—उत्तर ४० फुट असे एकुण १८०० चौ. फुट या दोन्ही मिळकतींची मोजणी करण्याकरिता तालुका भूमी अभिलेख, नांदगाव येथील मोजणीदार यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणुक करण्यात येते.

३. वादीने दोन्ही मिळकतीच्या मोजणीस आवश्यक असणारी मोजणी फी उधिक्षक भुमी निरिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, नांदागाव यांचेकडे चलनाद्वारे परस्पर जमा करावी व त्याची प्रत पुढील तारखेस दाखल करावी.

४. मा.कोर्ट कमिशनर यांनी आदेशात नमूद केल्याप्रमाणे दोन्ही मिळकतींची मोजणी करून अतिक्रमण आहे किंवा

नाही याबाबतचा अहवाल नकाशासह या प्रकरणात दोन महिन्यात सादर करावा.

५. वादी यांनी मोजणीस आवश्यक असणारी कागदपत्रे पुरवावित असे त्यांना सुचित करण्यात येते.

६. पुर्तता झाल्यानंतर आदेशिका पाठविण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

Maheshkumar Tanajirao Kharade

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2023.08.17 16:53:07 +0530

**दि.०९/०८/२०२३**

**(म.ता.खराडे)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**मनमाड शहर**